# 'महाराष्ट्राची लोककला लावणी'

**श्री. प्रवीण भांकर सोलनकर**
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड.

★★★

**सारांश** :— लावणीचे असलेले मराठी मानवी जीवनातील स्थान अतिशय महत्त्वाचे व मोलाचे आहे. लावणीला लोकसंस्कृती म्हटले आहे. आणि संस्कृती असलेल्या प्रत्येक घटनेला, स्थानाला अनन्य साधारण महत्व आहे. त्यामुळेच लावणीला महत्व प्राप्त झाले असावे असे वाटते. लावणी वाड्.मयातील रचनातून तत्कालीन समाज जीवनाचे विविध स्तरीय चित्र पहावयास मिळते. समाज जीवनातल्या या चित्रात धर्म आणि संस्कृती या अंगाचे जसे दर्शन घडते तसेच व्यक्ती जीवनाच्या पार्श्वभूमीवर त्यातील व्यक्तिजीवनाचे वेगवेगळे नमुने. स्वभाव विशेशांचे अनुभव आपल्याला जवळून दिसतात. लावणी वाड्. मयात प्रतिबिंबित झालेल्या तत्कालीन समाज जीवनाचे, त्या जीवनातील कुटुंब व्यवस्थेचे, कौटुंबिक नात्याचे आणि जिव्हाळयाचे जसे काही विशेष पहावयास मिळतात. तसेच समाजातील इतरही विषेश प्रसंगातून बरेच काही दिसून येते. अशा समाजजीवनाचा मागोवा याठिकाणी घेण्याचा प्रयत्न आहे.

**बिजशब्दः**—लावणीचीयाख्या,स्वरूप,प्रकार,लावणीकार, लावणीची आजची परिस्थिती,उपाय या गोष्टीचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते.

**प्रास्ताविक** :— संताच्या भक्तिभावातून गौळणी,अभंगाची निर्मिती झाली,याच भावनेतून पुढे लावणी अवतरली असावी. लावणीची निर्मितीमागची प्रेरणा भक्तीची होती. या भक्तिभावात स्त्री मनाची विविध रूपे प्रकट झालेली आहेत. पुरुषमनाला असलेली स्त्रीदेहाची,आणि शृंगाराची अभिलाषा काही गौळणीतून व्यक्त होताना दिसते. हीच अभिलाषा लावणीला कारणीभूत ठरली असावी. लोकसंगीतात लावणी प्रकार आजही लोकप्रिय आहे. मात्र त्याचे स्वरूप बदलत गेले आणि लावणीतील लावण्यही हरपत गेले. चित्रपटांच्या गीतांवर होणारे नृत्य असे आजकालच्या लावणी फडांचे स्वरूप झाल्याने, खरीखुरी लावणी हळूहळू लुप्त होत आहे.

**लावणीच्या व्याख्या** :— 1 ''ह्रदयाला चटका लावते ती लावणी''.

1 — अ.ब. कोल्हटकर. कोणतेही गीत असो ते माणसाला आवडले पाहिजे. त्याप्रकारे लावणी सुध्दा कशी अपवाद असेल ती सुध्दा माणसाला नाचवते. ती सतत गुणगुणावी वाटते. ती मानसाच्या ह्रदयाला चटका लावते ती लावणी होय.

2 ''शेतात लावणी करताना म्हटले जाणारे ते लावणी गीत''शेतकरी शेतीत कामे करत असताना त्याला आलेला थकवा दूर होण्यासाठी म्हटले जाणारे गीत लावणी असते. लावणी करत असताना म्हटलेले गीत लावणी होय. कामे लवकर होण्यासाठी आपल्याला आलेला थकवा दूर होण्यासाठी व मनोरंजन होण्यासाठी गीत म्हणतात त्या सुध्दा एक प्रकारे लावणी होय.

3''लावणी हे एक प्रकारचे ग्राम्य गीत आहे'

KIND OF RURAL EROTIC SONG.— अशा प्रकाराचा उल्लेख मराठी व्युत्पत्तिकोशात आहे. म्तवजपब हे विशेषण इंग्रजीत लावण्यातील ग्राम्यता शृंगार विषयक असते, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. इंग्रजी व मराठी अर्थातून ग्राम्यता, शृंगार व गेयता ही लावणीची तीन लक्षणे प्रामुख्याने आढळतात. या तीन लक्षणांसोबत नृत्यत्मकता हे ही लावणीचे लक्षण आहे असे मला सुचवावे वाटते. ग्रामीण किंवा ढंगाचे गीत म्हणजे लावणी असा अर्थ होतो.

4 ''लावणी म्हणजे शाहिरांनी विविध विषयावर तालबध्द,लयबध्द शब्दांनी साकार केलेली सुबक काव्यरचनना होय' तालबध्द, लयबध्द शब्दांपासून तयार झालेले गीत किंवा काव्यरचना लावणी होत असे देशमुख म्हणतात. सुबक रचना हया कोणत्या मानाव्यात आणि कोणत्या नाही याचे उत्तर देणे कठिण जाते. त्यामुळे हि व्याख्या अपुरी वाटते.

5 ''लावणी हा गायन प्रकार प्रामुख्याने भावनात्मक संगीताचा असल्याने लावणी म्हणजे शृंगार—विरहाचा परिपोष करणारी बहुजन समाजाच्या बोलीभाषेतील भावगीतच होय असे म्हटले असता चूक होणार नाही''. डॉ.मांडे यांनी लावणी हा गायन प्रकार असल्याचे सांगितले आहे. तसेच भावनेला प्राधान्य ते शृंगार विरह यांचा त्यात समावेश असतो. लावणीत एक प्रकारचा बहुजन समाज त्यांच्या बोलीभाषेत गीत तयार करतो आणि ते गीत म्हणजे लावणी अशी लावणीची व्याख्या केलेले आहे.

6 ''सर्वसाधारणपणे तालठेक्यात म्हणता येणारी पद्मावर्तनी वा भृंगावर्तनी मात्रावृतांत रचलेली कविता म्हणजे लावणी''.6

तालठेक्यात म्हणता येणारी पद्मावर्तनी, भष्भावर्तनी मात्रावष्तांत रचलेली असते. यमक जुळणारी तालात म्हणता येणारी कविता ही लावणी असे जरी असले तरी सर्व कविता हया लावण्या होत नाहीत.

### लावणीचे प्रकार

1) वगाची लावणी

2) बालेघाटी लावणी

3) छक्कड लावणी

4) जुन्नरी लावणी

5) धावती किंवा झडती लावणी

**6) हौदयाची लावणी क्र वगाची लावणी** – वग म्हणजे ओघाने केलेली रचना. वगाची चाल असलेली ही लावणी कथाप्रधान असून ती कथा सांगत पुढे जाते. शाहीर कथानकाचा थोडक्यात परिचय करून देतो. लोकांचे मन तात्काळ आकर्षन करणारे वगाची लावणी असते.

''कुणा देशात अमुक शहर,
तिथे राज्य करी तमका नरवीर
हत्ती घोडयाचं लावलष्कार
सेना मोठी – सेनापती कपटी''7

म्हणजे या लावणीचा बाजच मुळी वगाचा असतो. त्यामुळे वगाची चाल हा पद्यरचनेचा देखणा अविष्कार असतो यातून वगनाटयाची थोडक्यात रूपरेषा मांडली जात असते तिला तमाशा कलावंत 'नांदी' असे म्हणतात. या नांदीनेच शाहिरीच्या कार्यक्रमाला सुरूवात होते. वगाच्या लावणीमध्ये एखादी घटना मांडलेली आसते.

**बालेघाटी लावणी** – दुःखाची व विरहाची भावना असलेल्या लावणीला 'बालेघाटी लावणी' म्हटले जाते. या लावणीमध्ये दुःख,यातना, भोग आणि विरह भरलेला असतो. विरह भावना हा मानवी मनाचा एक आर्त आविष्कार आहे. ही भावना स्त्री आणि पुरुष या दोहोंच्याही मनातून संवेदित होते.

''उठउठुनी रातीची रडते
तळमळ पलंगी पडते
माझ्या संगती जळती समया
मी जागी निजता दुनिया
कुठे असाल,कधी याल,जवळी घ्याल''8

आपल्या पतीच्या जवळ नसण्याने पत्नीला रात्री–अपरात्री त्याच्या

आठवणीने ती रडत असते. ज्या प्रमाणे पणत्या जळत आहेत,त्या प्रमाणे मी पण जळत आहे. विरहाचे चित्रण जसे उत्कट व हळुवारपणे असते. एवढेच नाहीतर गतकाळाच्या आठवणी विस्मष्तीत गेल्या की,तेथे विरहाचा प्रत्यय योतोच.

**छक्कड लावणी** – छक्कड म्हणजे लावणीतील द्रुत चाल. 'छ' म्हणजे सहा ओळीचे कडवे ज्यात आहे ती छक्कड. पूर्वी नाचे लोक या लावण्या हावभाव करून सादर करायचे. स्त्रीचे वर्णन या छक्कड मध्ये केलेले असायचे. म्हणून याला छक्कड म्हणत असावेत. झगडा, छेड, राग, ईर्षा या भावनांचा कडक आविष्कार छक्कड मध्ये होत असतो. ठायी चालीतील लावण्या ऐकून कंटाळलेल्या रसिकावर छक्कड म्हणजे गुलाबपाण्याचा वर्षावच करून जातो. आधुनिक लावणीकार म्हणून ओळख असणारे सुहास म्हस्के यांनी हगणदारीमुक्त गाव या संकल्पनेवर छक्कड लावणी लिहीली आहे.

''गुड मॉर्निगंचा झालाय वांधा,
राया लगेच शौचालय बांधाकृ
रोज सकाळी पथक फिरतंया,
माझं काळीज धडधड करतंयाकृ
नाक झाकून कुठं चालायचं,
चांगल्या रस्त्याचं वाटूळ व्हायचं,
सा–या घाणीचा झालाय रेंदा,
राया लगेच शौचालय बांधाकृ''

सुहास म्हस्के यांची ही अधुनिक लावणी विजया पालव या लावण्यवतीने अकलूजच्या लावणी स्पर्धेत पहिल पारितोषिक मिळवून दिले आहे. या छक्कड प्रकारची लावणी सादर करण्यारी लावण्यवतीने चालू विषय हाताळून या लावणीला प्रसिध्द केलेले आहे. कारण खेडयात आजपण प्रत्येकाच्या घरात पंधरा–वीस हजारांचे मोबाईल आहेत. परंतु साध संडास बाथरूप नाही. महाराष्ट्र राज्य शासनाने हागणदारी मुक्त गाव योजना राबवून प्रत्येक गावात संडास बाथरूप बांधण्यासाठी प्रयत्न करत असताना ही छक्कड लावणीने अकलूज लावणी स्पर्धेत पहिले पारितोषिक मिळवून दिले आहे.

**जुन्नरी लावणी** – जुन्नरी लावणी हा लोककला प्रकार आता जास्त प्रमाणात कोणत्याही तमाशात किंवा लावणी फडात म्हटला जात नाही. जुन्नरी लावणीतील गद्य घाईने म्हणावे लागते. त्यासाठी धावती चाल असावी लागते. धावती चाल म्हणणे म्हणजे समोरील प्रेषकांना न समजण्यासारखे होते. त्यामुळे हा प्रकार लोप पावत चालचा आहे.

''कष्टाची बरी भाजि भाकरी तुप साखरेची चोरी नको।
आल्या अतिथा मुठभर द्याया मागे – पुढती पाहु नको।
दिली स्थिती देवाने तीतच मानी सुख कधी विटु नको।''9

अनंत फंदी यांच्या लावण्या फार प्रसिध्द आहेत. त्यापैकी ही जुन्नरी लावणी आहे. एखादा कीर्तनकार त्याच्या तीन तासाच्या व्याख्यानातून जे जीवनाचे तत्त्वज्ञान सांगतो ते अचूकपणे अनंत फंदी यांनी या लावणीतुन मांडले आहे. चोरीकरून पोट भरण्यापेक्षा कष्टाची भाजी भाकरी मानसाला सुख देत असते. आपल्या घरी येणा–या तहानलेल्या व भुकेलेल्या अन्न देताना मागे पुढे पाहू नका असे वर्णन या लावणीत केलेले आहे.

**झडती लावणी** – वरवरचे मनोरंजनात्मक वर्णन करणारी ही लावणी असते. शब्दचमत्कृती, शब्दललित्य, भावनेच्या आहारी न जाता केवळ मनोरंजनासाठी गंमत म्हणन केलेली लावण्यमयी रचना म्हणजे ध ाावती लावणी होय.

''ही नटरंगी नार, मारी काळजात वार,
पाडी कासोटयाला, पार चापुनिया पट्टी।
पाटलाला दावला चाळा, कुलकर्ण्याला घाली डोळा,
मास्तरानं सोडली शाळा हिच्यासाठी।।१।।

तेल्यापासून तेल नेती, वाण्यापासून गूळ नेती,
हनं गुजराला वेडा केला गं, खुळा झाला ब्राह्मण,''10

('मराठी पारंपारिक लावणी', पृ –73)

पठ्ठे बापूरावांच्या लावणीतील लावण्यवती आपलया आदाकारीने गावातील सर्वाना भुरळ घालीत आहे. बाराबलूतेदारी अस्तित्वात असणा–या काळात सर्व जातीजमाजींचा नामोल्लेख या लावणीत आला आहे. वाटेवरून येणारा जाणाराला या नटरंगीने सोडले नाही. पाटला बरोबर चाळा करते आणि कुलकर्णी काकाला डोळा मारते. हिच्या आदाकारीने तर कहरच केला गुरुजीन शाळेत येणेच बंद केले. प्रत्येक व्यापा–याला गोड बोलून त्यांच्यापासून तेल,गुळ,साखर अशा संसार उपयोगी वस्तू घेवून जाते. या लावणीतून पठ्ठे बापूरावांनी गावातील नटरंगी नार कसे संपूर्ण गाव बेजार करते याची प्रचती देतात.

**हौदयाची किंवा चौकाची लावणी** – चार चौकाची ,चार वेळा चाली बदलणारी लावणी म्हणजे चौकाची लावणी होय.हत्तीला सजवण्यासाठी त्याच्या पाठीवर अंबारी चौकोनी आकाराची असते, तसेच तालमीतील कुस्ती खेळण्याचा हौद चौकोनी असतो. त्याप्रमाणे लावणीत त्यावरून ही लावणी प्रकार तयार झालेला असावा असे वाटते. नऊ ते दहा ओळीची कडवे असणा–या रचनेला 'चौक' असेही म्हणतात. असे अनेक चौक एकत्रीत असलेल्या हया हौदयाच्या किंवा चौकाच्या लावण्या होत.

''घरामध्ये नवीन तरणी जान, सुबक ठेंगणी
वयाने लहान मला नुकतेच आले नहाण
पती दुष्मान परठाई अंग सखे दु:ख
सांगू या कर्माची कहाणी।।१।।
मारून धनद्रव्यावर लाथ वाटते जावा
धरून याचा हात आबरू जाईल
याजगात अथवा घात करू काही। अगं सखें।।२।।''

('मराठी पारंपारिक लग्न होऊन घरामध्ये आलेल्या सुनबाईच भावनिक आंदोलनाचे प्रतिबिंध या लावणीतुन मांडण्यात आलेले आहे. ही लावणी सगनभाऊची आहे. या लावणीला हौदयाची लावणी असे म्हणता येईल कारण या लावणीतील प्रत्येक चौकाची चाल ही वेगळी आहे असे तिचे सादरीकरण करताना ते जाणवते. कारण त्यावेळी आपण रसिक प्रेक्षक असतो. लावणी वाचत असताना तीची चाल वाचकांना माहीत नसते. त्यामुळ वाचक लावणी ताला सुरात न वाचता अगदी साध्या पध्दतीने वाचतात. त्यामुळे त्यांना चाल लक्षात येत नाही.

**लावणीचे महत्त्व** महाराष्ट्राची लोककला किंवा लोकनष्त्य कला म्हटल्यावर लहानथोरापासून लावणीचे नाव घेतील. लावणी माहीत नसणारा कोणीही नसेल. एवढा लावणीचा प्रभाव मराठी रसिकांवर उमटलेला आहे. मात्र या लावणीला म्हणावी तशी प्रतिष्ठा मिळालेली नाही. कारण तिचे बोल व कामोत्तेजक,भावभावनांचे दर्शन यामुळे लोकांनी तिचा अर्थ वेगळा घेतला आणि तिला गावकुसाबाहेरचे जीवन जगावे लागले. गावकुसाबाहेर राहून तिने आपले अस्तित्व टिकवून ठेवले. गेल्या दोन–तीन दशकांत पांढरपेशांचेही मनोरंजन करताना दिसत आहे. त्या कलेने अनेक बदल–स्थित्यंतरे पचवली आहेत. लावणी पेशवाईच्या अस्ताबरोबर संपली असे वाटत असतानाच खोलवर घुसवली गेलेली ती एक कला आहे. जमिनीच्या आतून बाहेर पडून आकाशाच्या दिशेने वर फोफावलेली व बहरलेली जाणवते.

लावणी ही स्त्रीनष्त्यप्रधान कला असल्यामुळे त्याकडे सारेजण आकर्षित झालेले दिसतात. पेशवाईच्या काळापासून पुरूष मंडळी कामानिमित्त दोन तीन वर्ष तरी घराबाहेर असते. घरची स्त्री विरहात,चुकून नीतिच्या दष्टीने पाय वाकडे वळणे नाकारता येत नव्हते. अशा नीतिचे व अनीतिचे,विरहाचे इष्काचे मोठे रोचक वर्णन त्या काळापासून आज पण होत राहिले आहे. राधा–कष्ण,गवळणी,रासलिला,शंकरपार्वती हे विषय शाहिरांनी हाताळले तरी त्यांची वष्त्ती इष्कात रंगली. गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत लावणी हा विषय गाजलेला होता. तसा विचार केला तर लावणी ही टाकाव नव्हती. जितके टाळाला महत्त्व होते तितकेच चाळाला पण महत्तव होते. टाळाची व चाळाची गरज संपूर्ण महाराष्ट्राला होती आणि आहे. लावण्याची लज्जत वाढवण्यासाठी सुंदर चालींना स्वरही सुमधूर,मंजूळ व गोड असावा लागतो. तरच लावणी लावणी होते. आज त्याच लावण्या तमाशातून फडातून,बारीतून यात्रामधून पहावयास व ऐकावयास मिळत होत्या. अजूनही पुष्कळ गायिका व नष्त्य कलावंतीणी आहेत. त्यांची उणीव नाही फक्त योग्य मार्गदर्शकाची,नियोजनाची,कलेशी प्रामाणिक राहून अदाकारी करण्याची आवश्यकता आहे. या चाल आणि ताल याच्या जोरावर काही लावण्या परदेशी गेल्या आहेत. काही चित्रपटात गेल्या आहेत. महाराष्ट्राची शान आणि कलेचा अभिमान असणारी ही लावणी जिवंत ठेवायची असेल तर नवनवीन वगनाटये,लावणी रचना करून योग्य ते शिक्षण कलावंताना देणे गरजेचे आहे.

लावणी महोत्सव कार्यक्रम घेणे गरजेचे आहे. लावण्यवत लावणीचे रूप गोंडस,साजरं गोजर मिळवायचे असेल लावणीकार,संगीत,दिगदर्शक,नवे नवे नष्त्य कलावंत,कलावंतीणीचा गौरव करून त्यांना मानधन दिले पाहिजे. लावणी रचणा–याकडून नव लावणी निर्मितीच्या निर्माणसाठी प्रोत्साहनपर बक्षीस योजना राबवाव्यात. लावणी टिकली तरच कलावंत टिकतील. लावणीरचनाकार व लावणी कलावंतीणीना योग्य स्थान जर समाजाने दिले तरच त्या योग्य प्रकारे लावणी सादर करतील.

**शिफारशी**

1. लावणी जिवंत ठेवण्यासाठी तिचा प्रचार करणे गरजेचे आहे.
2. लावणीकार यांना पेशवाईप्रमाणे मान सन्मान दिला पाहिजे.

3. मुंबई व नागपूर विद्यापीठाप्रमाणे लावणी हा विषय अभ्यासक्रमात ठेवला पाहिजे.
4. आकूलज लावणी महोत्सवाप्रामणे लावणी महोत्सव घ्यावेत.
5. लावण्यवती व लावणी रचनाकार यांना वृष्दापकाळात मानधन दयावे.
6. लावणी कार्यक्रमासाठी सांस्कषतिक भवने जिल्हाच्या ठिकाणी बांधावे.
7. राज्य सरकारच्या वतीने देण्यात येणारे पुरस्कार कलावतांना योग्य त्या वेळी दयावेत,
8. लावणीला अभ्यासक्रमात स्थान देण्यात यावे.

## निष्कर्ष

1 लावणीतून शृंगाररस निर्झराप्रमाणे वाहतो.
2 लावणी वाद्यांमध्ये काळानुरुप बदल झालेला दिसला.
3 लावणी मनोरंजनाचे साधन आहे.
4 लावणीतून जीवन जगण्याचा दिलेला जीवनसंदेश हा तत्ववेत्त्याच्या भूमिकेतून मांडला आहे, असे दिसते.

*संदर्भ :–*


1. *डॉ.दि.भी.गायकवाड, सेट नेट मराठी, प्रगती बुक्स प्रा.लि.पान 12.28*
2. *म.वा.धोंड,'म–हाटी लावणी' मौज प्रकाशन,मुंबई, तिसरी आवष्त्ती. 2003 पान 17*
3. *कष्पा.कुलकर्णी,'मराठी व्युत्पत्तीकोश,लेखनवाचन भांडार,पुणे पान 676*
4. *प्रा.बी.बी.देशमुख,'लावणी वाड्:य:उद्गम आणि विकास पान*
5. *डॉ. प्रभाकर मांडे,मराठवाडयातील कलगी–तु–याची आध्यात्मिक शाहिरी पान 2*
6. *डॉ. गंगाधर मोरजे,मराठी लावणी वाड्:मय पान 58*
7 . *भारतीय संस्कष्ती कोश,खंड आठवा पान 361*
8. *राजा मंगळवेढेकर,'शाहीर ग.दि.माडगूळकर', पान 76*
9. *वि.ना.आहेर,स्वांतत्र्योत्तर कालीन मराठी लावणी वाड्:मय एक चिकित्सक अभ्यास,पीएच.डी.प्रबंध,डॉ.बा.आ.म.वि.औरंगाबाद पान 72*
10. *वि.ना.आहेर,स्वांतत्र्योत्तर कालीन मराठी लावणी वाड्:मय एक चिकित्सक अभ्यास,पीएच.डी.प्रबंध,डॉ.बा.आ.म.वि. औरंगाबाद पान 76*